महाराष्ट्र शासन
कर्मवीरमा.सा.कन्नमवार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णांलय,चंद्रपूर
Govt. T.B. Hospital Campus, Ramnagar , Chandrapur - 442401, M.S. (INDIA)
Telephone No.:- 07172- 277104 Fax No.:- 07172- 277103
Website :- www. gmcchandrapur.org Email :– gmcchandrapur@gmail.com

जा.क्र.कमासांकशावैमवरुच/नर्सिग रुग्णांलय आस्था/जाहिरात/ 5613-16 /२०२६ दिनांक :- 18/09/२०२६

जाहिरात
(Interview - मुलाखत)

विषयः– कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णांलय,चंद्रपूर येथे वैद्यकीय अधिकारी गट–ब ची एकुण ०४ पदे १२० दिवसा करीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरणे बाबत.

संदर्भ :–१) शासननिर्णय क्र.ई.०६७७४४/२०२५/वैसेवा–३,दिनांकः २३/०५/२०२५.
२) या कार्यालयाची मंजूर टिप्पणी दिनांक : १७/०९/२०२६

कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णांलय,चंद्रपूर येथे वैद्यकीय अधिकारी गट–ब ची एम.बी.बी.एस.ही शैक्षणीक अर्हता असलेले एकुण ०४ पदे १२० दिवसा करीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत. त्या करीता एम.बी.बी.एस. ही शैक्षणीक अर्हता असणा–या उमेदवाराकडुन वैद्यकीय अधिकारी गट–ब ची पदे भरण्यां करिता योग्य त्या अर्हता प्राप्त उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. गुणवत्तेच्या जेष्ठतेप्रमाणे नियुक्तीला प्राधान्य देण्यात येईल.

त्यासाठी वैद्यकीय अधिकारी पदांची ०४ पदाकरीता **जाहीरात** देण्यात येत आहे.

१)**अर्ज मिळण्याचे ठिकाणः–**
मा.अधिष्ठाता यांचे कार्यालय,कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथे रुग्णांलय आस्थापना विभाग, कार्यालयीन वेळेत **दिनांक १९.०९.२०२६ ते दिनांक २८.०९.२०२६** पर्यंत मिळतील.
अर्जाची किंमत : रु.२००/– रोखपाल विभागामध्ये जमा करावी

२) **अर्ज स्विकारण्याचा कालावधीः–**
दि.१९.०९.२०२६ ते दि:२८.०९.२०२६ पर्यंत सकाळी १०.०० ते सायंकाळी०५.०० वाजे पर्यंत राहिल.

३) **अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख :–**
दि. २८.०९.२०२६ रोजी सायंकाळी०५.००वाजे पर्यंत राहील.

४) **मुलाखतदिनांक :–**

४.१) मुलाखत **दि.०५.१०.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता अधिष्ठाता कार्यालय**, कर्मवीर मा.सां.क. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णांलय, चंद्रपूर यांच्या दालनात घेण्यात येईल.
४.२) मुलाखती साठी उमेदवारांना वेगळे पत्र पाठविले जाणार नाहीत.
४.३) मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ प्रमाणपत्रे(Original-Certificates)सादर करणे आवश्यक आहे.
४.४) मुलाखतीस स्वखर्चाने हजर राहावे लागेल त्यासाठी कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

५) **अटी व शर्ती :–**
५.१) उमेदवाराने अर्जा सोबत सर्व कागदपत्रांच्या सांक्षाकींत प्रतीजोडणे आवश्यक आहे.

५.२) अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावा लागेल.अर्ज विहीत नमुन्यात नसल्यास किंवा अर्ज अपुर्ण असल्यास अर्ज नामंजुर करण्यांत येतील.

५.३) उमेदवारास जर काही कारणास्तव राजीनामा द्यावा लागत असले तर एक महिना अगोदर पूर्व सूचना(Prior Intimation)विभाग प्रमुखांमार्फत या कार्यालयास सादर करावी लागेल. अन्यथा एक महिण्याचे मुळ वेतन शासनखाती जमा करण्यात यावे.

५.४)वरील सर्व जागा पूर्णवेळ आहेत.निवड झालेल्या उमेदवाराने २४ तास कर्तव्या वर उपस्थित असणे बंधनकारक राहील.

५.५) अंतीम निवड झालेल्या उमेदवारांना खाजगी संस्थेत,मंडळ,निमशासकीय कार्यालया मध्ये कोणत्याही प्रकारची नोकरी स्विकारता येणार नाही किंवा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. जर तसे कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

५.६) गुणवता यादी ही एम.बी.बी.एस/पदव्यूत्तर परिक्षेतील गुणांवर ठरविण्यात येईल तसेच पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण करणाऱ्यांना गुणवत्तेप्रमाणे प्राधान्य देण्यात येईल.आणि
बंधपत्रि तउमेदवाराना प्राध्यान्य राहील

५.७)वरील जाहिराती मधील पदांच्या संख्येत कमी-अधिक करण्याचा,निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेशनिर्गमित करण्याचे अथवा प्रलंबित ठेवण्याचे अथवा नियुक्ती रद्द करण्याचे तसेच सदर जाहिरात रद्द करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांना राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

५.८) जाहिरात दिलेल्या पदाचीनियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात असुन शासना कडुन अथवा संचालनालया कडुन उमेदवाराची नियुक्ती झाल्यास कोणतीही पुर्वसुचना व कोणतेही कारण न दर्शविता सेवा तात्काळ समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांना असतील.

५.९)जे उमेदवार इतर संस्थेत कार्यरत आहेत त्यांनी सदर संस्थेचे नाहरकत प्रमाणपत्र सादर केल्या नंतरच नियुक्ती देण्यात येईल.

६.१) निवड झालेल्या उमेदवारांना **दि. ०६.१०.२०२६ म.पू.**पासून नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

६.२) निवड झालेल्या उमेदवारांना वरिष्ठांनी आदेशीत केल्याप्रमाणे संबधीत विभाग/ रुग्णकक्ष/ कोविड-१९ च्या रुग्ण कक्षा मध्ये कर्तव्य बजावणे बंधनकारक आहे तसेच या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नियुक्तीसाठी प्राधान्य देण्यात येईल.

६.३) नियुक्तीनंतर मा. अधिष्ठाता यांच्या आदेशानुसार कोणत्याही विभागात कामकरणे अनिवार्य आहे.

६.४) दिव्यांग उमेदवारास प्राधान्य राहील.

१. शैक्षणिक पात्रता:-महाराष्ट्र आयुर्विज्ञान परिषद व भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार.

२. वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती ही १२० दिवसांच्या कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे त्यांची निवड गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

३. बंधपत्रीत उमेदवारांना प्रथम प्राध्यान्य देण्यात येईल.

४. **वेतन**:- वैद्यकीय अधिकारी गट-ब या पदाकारीता रु. ८०,०००/- मानधन अनुज्ञेय राहील.

५. महाराष्ट्र मेडीकल कॉन्सिल यांच्या कडील वैधता प्राप्त (Valid MMC Registration) नोंदणी असणे आवश्यक आहे.

६. १) प्रथमप्राधान्य या संस्थेतील एम.बी.बी.एस पास झालेले विद्यार्थी यांना राहील.
२) व्दितीय प्राधान्य विदर्भातील शा.वै.महाविद्यालय येथुन एम.बी.बी.एस पास झालेले विद्यार्थी यांनाराहील.
३) गर्व्हनमेंट ऑफ महाराष्ट्र शासकीय महाविद्यालयय मधून एम.बी.बी.एस. पास झालेले विद्यार्थी यांना राहील.
४) प्रायव्हेट, विदर्भातील एम.बी.बी.एस झालेले विद्यार्थी यांना राहील.
५) विदर्भबाहेरील एमबीबीएस पास झालेले विद्यार्थी यांना राहील.

६) महाराष्ट्र डिम युर्निवरसिटी बाहेरील एम.बी.बी.एस पास झालेले विद्यार्थी यांना राहील.

अधिष्ठाता,
कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रुग्णांलय, चंद्रपूर

प्रति,
सूचनाफलक,
कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णांलय,चंद्रपूर
प्रत :- १) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य यांना सुचना फलकावर लावण्या करीतास स्नेहपुर्वक सादर.
३) कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपुर या संस्थेचे संकेतस्थळ

www.gmcchandrapur.org